# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

**क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या आस्थापनेवर अतिदक्षता विभाग (ICU) विभागाकरिता कंत्राटी तत्वावरील पद भरती.**

**क्र एचओ/ 1868 /केएमजेपी दिनांक 31.08.2026**

क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, विक्रोळी (पूर्व) येथील अतिदक्षता विभाग (ICU) तातडीने सुरू करण्यासाठी आणि २४ x ७ अखंडित रुग्णसेवा देण्यासाठी 'विशेष कौशल्य व अनुभवासाठी वेतन' देऊन थेट कंत्राटी पद्धतीने खालील तक्त्यात दर्शविलेली पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखत (Walk-in Interview) घेण्यात येईल. त्यासाठीची निवड यादी बनविण्याकरिता सदर पदांच्या नमूद केलेल्या अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर अर्जाची स्विकृती दि.**31.08.2026 ते दि.15.09.2026** पर्यंत (कार्यालयीन वेळेत) संध्या. 16.00 वाजेपर्यंत **प्रमुख वैद्यकीय अधिकारी क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय, विक्रोळी** येथे करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | पदनाम (Post Name) | पदसंख्या | आवश्यक अर्हता व अनुभव (Qualification & Experience) | प्रस्तावित दरमहा ठोक वेतन |
|---|---|---|---|---|
| 1 | अतिदक्षता विभाग प्रमुख (PGMO / Hon. / Ass. Hon) | ०१ | जनरल मेडिसिन विषयातील पदव्युत्तर पदवी (MD / DNB) आणि पदव्युत्तर पदवीनंतरचा ८ वर्ष / ५ वर्ष / १ ते ५ वर्षे अनुभव. | रु. १,३५,०००/- ते रु. २,००,०००/- (अनुभवानुसार) |
| 2 | प्रबंधक (Registrar) | ०४ | एमडी / डीएनबी मेडिसिन किंवा शासकीय / महापालिका रुग्णालयातील १ वर्षाचा हाऊसपोस्ट / ICU अनुभव. | रु. १,१०,०००/- ते रु. १,२५,०००/- |
| 3 | आवास अधिकारी (Houseman) | ०४ | एमबीबीएस / एफएमजी पदवी आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे (MMC) नोंदणीकृत. | रु. ९०,०००/- |

